मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

दैनिक

# रयत समाचार

epaper.rayatsamachar.com

खिंचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ४९० वा ● गुरुवार, ता. ०८ जानेवारी २०२६ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००





## दिव्यांग व्यक्तींच्या सर्वसमावेशक शिक्षणाकरिता सामूहिक बांधिलकी महत्त्वाची- तुकाराम मुंढे

**पुणे । रयत समाचार**

दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी हक्काधिष्ठित व संशोधनाधारित समावेशक शिक्षण देण्याची सामूहिक बांधिलकी अत्यंत महत्त्वाची असून, यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे, असे प्रतिपादन राज्याच्या दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी केले. नॅशनल कन्व्हेन्शन ऑफ एज्युकेटर्स ऑफ द डीफ (एनसीईडी) महाराष्ट्र आणि अली यावर जंग राष्ट्रीय वाणी व श्रवण दिव्यांगजन संस्था, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने फर्ग्युसन महाविद्यालय येथे आयोजित 'दिव्यांगतेच्या दृष्टिकोनातून व संशोधनाच्या आधारे समावेशक शिक्षण' या विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी संस्थेचे संचालक डॉ. सुमन कुमार, एनसीईडीच्या अध्यक्षा डॉ. मीरा सुरेश, कॉक्लिआ संस्थेचे मुख्य विश्वस्त डॉ. अविनाश वाचासुंदर, शुभदा बुर्डे, डॉ. गायत्री आहुजा, शिल्पी नारंग आदी उपस्थित होते. समावेशक शिक्षणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संशोधनाधारित धोरणे, शिक्षकांची परिवर्तनकारी भूमिका, विभागांतील समन्वय, उत्तरदायित्व व पारदर्शक प्रशासन आवश्यक असल्याचे मुंढे यांनी सांगितले. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६, समानता व सामाजिक न्याय यांचे महत्त्वही त्यांनी अधोरेखित केले. या परिषदेत देशभरातून सुमारे ३५० प्रतिनिधींनी सहभाग नोंदविला. यावेळी परिषदेच्या स्मरणिकेचे अनावरण करण्यात आले.

## 'तारे जमीन पर' आंतरशालेय विज्ञान मेळा आयोजन




**मडगाव । रयत समाचार**

शैक्षणिक व संशोधन क्षेत्रातील एकत्रीकरणाला चालना देण्यासाठी बोर्ड ऑफ इनोव्हेटिव्ह एज्युकेशन, गोवा (BIE) आणि ए.जे. अकादमी फॉर रिसर्च अँड डेव्हलपमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने पहिला तारे जमीन पर गोवा आंतरशालेय विज्ञान मेळा २०२६ शुक्रवार व शनिवार, ता. ९ व १० जानेवारी २०२६ रोजी मडगाव येथील सम्राट गार्डन येथे आयोजित करण्यात आला आहे. हा विज्ञान मेळा चौथी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी संशोधन-केंद्रित उपक्रम असून, विद्यार्थ्यांना वैज्ञानिक पद्धतीचा वापर करून समस्या सोडवण्याची संधी देणारा आहे. भौतिक विज्ञान, जीवन विज्ञान व पर्यावरण विज्ञान अशा विविध श्रेणींमध्ये विद्यार्थ्यांचे प्रकल्प सादर होणार असून, या माध्यमातून तरुण संशोधकांना नाविन्यपूर्ण विचार मांडण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाणार आहे. ता. ७ जानेवारी रोजी मिरामार येथील सीएसपीएचमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत ए.जे. अकादमी फॉर रिसर्च अँड डेव्हलपमेंटचे संचालक मुहम्मद अब्दुल्लाह जावेद यांनी सांगितले की, आजच्या तरुणांना विज्ञान संशोधनासाठी प्रेरणा दिल्यास भारताला भविष्यात जागतिक स्तरावर मान्यता मिळू शकते. पालक-शाळा भागीदारी हे या मेळ्याचे वैशिष्ट्य असून, शिक्षक व पालक यांच्या संयुक्त प्रयत्नांतून भावी शास्त्रज्ञ घडवण्यावर भर देण्यात येणार आहे. नियमित विज्ञान प्रदर्शनांपेक्षा वेगळा, हा पूर्णपणे मौलिक व संशोधनाधारित विज्ञान मेळा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. गोवा राज्यातील विविध शाळांमधील सुमारे २२० विद्यार्थी ९७ नाविन्यपूर्ण संशोधन प्रकल्प सादर करणार आहेत. तज्ज्ञ परीक्षकांच्या पॅनेलद्वारे मूल्यांकन करून निवडक प्रकल्पांना नवोदित शास्त्रज्ञ, उदयोन्मुख शास्त्रज्ञ व तरुण शास्त्रज्ञ अशी पारितोषिके दिली जाणार आहेत. सर्व सहभागी शाळा, विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांना सहभाग प्रमाणपत्रे देण्यात येणार आहेत. या विज्ञान मेळ्याचे उद्घाटन प्रा. एफ. एम. नदाफ, प्राचार्य, गोवा सरकारचे ऑटोनॉमस कॉलेज ऑफ मल्टीडिसिप्लिनरी स्टडीज अँड रिसर्च, मडगाव यांच्या हस्ते होणार आहे. समारोप कार्यक्रमास डॉ. सुनील कुमार सिंग, संचालक (मुख्यालय), सीएसआयआरएनआयओ, गोवा हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. हा विज्ञान मेळा ९ व १० जानेवारी रोजी सकाळी १०.३० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत सर्वांसाठी खुला राहणार असून, शेवटच्या दिवशी सायंकाळी ६.३० ते ८.३० या वेळेत पारितोषिक वितरण समारंभ होणार आहे. पुढील पिढीतील शास्त्रज्ञांच्या नाविन्यपूर्ण उपक्रमांचे साक्षीदार होण्यासाठी विद्यार्थी, पालक, शिक्षक, विज्ञानप्रेमी व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## आमदार संग्राम जगताप यांचे दोन पोलीस अंगरक्षक निलंबित



**अहमदनगर । रयत समाचार**

सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)चे अहिल्यानगर शहराचे आमदार संग्राम जगताप यांच्या सुरक्षेसाठी नियुक्त असलेले दोन पोलीस अंगरक्षक कर्तव्यात कसूर व सरकारी शस्त्राची हलगर्जीपणाने हाताळणी केल्याच्या ठपक्यावर निलंबित करण्यात आले आहेत. जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी याबाबतचे आदेश जारी केले आहेत. नीलेश भालसिंग आणि राघवेंद्र भालसिंग अशी निलंबित पोलीस अंमलदारांची नावे आहेत. आमदारांच्या सुरक्षेसाठी एकावेळी एकच अंगरक्षक नियुक्त असताना, दोघेही एकाच वेळी एकाच ठिकाणी आढळून आले. तसेच कर्तव्याचे ठिकाण सोडून बोल्हेगाव परिसरात जाणे आणि जवळील सरकारी रिव्हॉल्व्हर निष्काळजीपणे हाताळल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. अहिल्यानगर महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात तणावपूर्ण वातावरण असताना शस्त्राची अशा प्रकारे हलगर्जीपणाने हाताळणी गंभीर मानण्यात आली आहे. दरम्यान, शिवसेना (ठाकरे गट)च्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी समाजमाध्यमांवर एक चित्रफीत प्रसिद्ध केली होती. या चित्रफितीत एका पोलिसाच्या हातात रिव्हॉल्व्हर दिसत असून तो महापालिका निवडणुकीतील उमेदवाराच्या घरासमोर असल्याचा आरोप करण्यात आला होता. या प्रकरणाची दखल घेत शरद पवार गटाचे खासदार नीलेश लंके व पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी पोलीस अधीक्षकांची भेट घेऊन तातडीने कारवाईची मागणी केली होती. चित्रफितीतील दृश्यांच्या आधारे प्राथमिक चौकशी केल्यानंतर पोलीस अधीक्षक घार्गे यांनी संबंधित दोन पोलीस अंमलदारांच्या निलंबनाचे आदेश दिले. या कारवाईमुळे जिल्हा पोलीस दलासह नगर शहराच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. निवडणूक काळात आचारसंहितेनुसार नागरिकांकडील शस्त्रे जमा केली जात असताना, पोलिसांकडूनच शस्त्र हाताळणीत निष्काळजीपणा झाल्याने या घटनेचे गांभीर्य अधिक वाढले आहे.

## अजित पवार महाराष्ट्राचे आका- महेश लांडगे

**पिंपरी-चिंचवड । रयत समाचार**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भाजपवर टीका केल्यानंतर भाजप आमदार महेश लांडगे यांनी तीव्र प्रत्युत्तर देत अजित पवारांवर सडकून टीका केली. ''७० हजार कोटींच्या कथित घोटाळ्याच्या आरोपावरून अजित पवार हेच महाराष्ट्रातील भ्रष्टाचाराचे आका आहेत,'' असा थेट आरोप लांडगे यांनी केला. ''आम्ही पुराव्यानिशी आरोप करू, पण ते आरोप अजित पवारांना सहन होणार नाहीत,'' असे सांगत लांडगे म्हणाले की, उमेदवारी मागायला कोणी येत नसल्याने अजित पवार चिडचिड करत आहेत. चिठ्ठी वाचून स्क्रिप्टेड भाषण करणे ही त्यांची सवय झाली असल्याची टीकाही त्यांनी केली. ''१९९१ पासून अजित पवार पिंपरी-चिंचवडच्या राजकारणात सक्रिय असून ते कायम सत्तेत राहिले. पाच वेळा उपमुख्यमंत्री राहूनही त्यांनी नेमके काय केले, असा सवाल आहे. उंटावर बसून शेळ्या हाकण्याचे काम त्यांनी केले,'' असा घणाघात लांडगे यांनी केला.



शरद पवारांमुळेच अजित पवार पिंपरी-चिंचवडमध्ये आले आणि ओळख निर्माण झाली, मात्र आज त्यांनी शरद पवारांना सोडून भाजपसोबत जाणे का पसंत केले, हा प्रश्न उपस्थित करत भ्रष्टाचार लपवण्यासाठीच ते सत्तेत सहभागी झाले का, असा थेट सवालही लांडगे यांनी केला. ''माझ्या संपत्तीवर बोलण्याऐवजी अजित पवारांनी स्वतःची जुनी आणि सध्याची परिस्थिती पाहावी. गेली २५ वर्षे ते पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री असून पाच वेळा उपमुख्यमंत्री राहिले आहेत,'' असे म्हणत त्यांनी अजित पवारांच्या संपत्तीकडेही बोट दाखवले. दरम्यान, ''महानगरपालिकेत भ्रष्टाचार करणाऱ्या आकाला संपवायचे आहे,'' असे वक्तव्य यापूर्वी अजित पवार यांनी केले होते. या वक्तव्यालाच प्रत्युत्तर देत आमदार महेश लांडगे यांनी आज अजित पवारांचा खरपूस समाचार घेतला.

## पत्रकारांनी समाजाभिमुख, निर्भीड, मूल्याधिष्ठित पत्रकारिता जपली पाहिजे- प्रा.शिंदे

### प्रकाश कुलथे यांचा दर्पण पुरस्काराने सन्मान

**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**

येथील ज्येष्ठ पत्रकार प्रकाश कुलथे यांना वृत्तपत्र क्षेत्रातील प्रतिष्ठेचा राज्यस्तरीय आचार्य बाळशास्त्री जांभेकर दर्पण पुरस्कार पत्रकार दिनी प्रदान करण्यात आला. आद्य पत्रकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचा जन्मगाव पोंभुर्ले (ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग) येथे उभारलेल्या दर्पण सभागृहात महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या शुभहस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर सिंधुदुर्गच्या जिल्हाधिकारी तृप्ती घोडमिसे, पोलीस अधीक्षक डॉ. मोहन दहिकर, महाराष्ट्र पत्रकार कल्याण निधीचे अध्यक्ष रवींद्र बेडकीहाळ, उपाध्यक्ष कृष्णा शेवडीकर, माजी आमदार रमेश जठार तसेच मुंबई आकाशवाणीचे सहाय्यक केंद्र संचालक जयेंद्र भाटकर उपस्थित होते. समारंभात बोलताना प्रा. राम शिंदे यांनी लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाची भूमिका बजावताना पत्रकारांनी समाजाभिमुख, निर्भीड व मूल्याधिष्ठित पत्रकारिता जपली पाहिजे, असे मत व्यक्त केले. प्रकाश कुलथे यांनी दीर्घकाळ केलेल्या निष्ठावान व सामाजिक बांधिलकीच्या पत्रकारितेचा गौरव म्हणून त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. वेगवान व बदलत्या माध्यम क्षेत्रातही पत्रकारिता आपले अस्तित्व टिकवून असल्याचे नमूद करत, त्याचे श्रेय आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांनी घालून दिलेल्या धोरणांना जाते, असे शिंदे म्हणाले. महाराष्ट्र पत्रकार कल्याण निधीतर्फे दिला जाणारा दर्पण पुरस्कार हा जांभेकरांच्या नावाने दिला जात असल्याने तो पत्रकारितेतील सर्वोच्च सन्मान असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. बाळशास्त्री जांभेकर यांच्या जन्मगावातील स्मारक प्रकल्पासाठी स्थानिक विकास निधीतून निश्चितपणे निधी उपलब्ध करून देण्याची ग्वाही देत, ग्रामपंचायत व पत्रकार कल्याण निधीने तातडीने अहवाल सादर करावा, असेही त्यांनी नमूद केले. समारंभाचे अध्यक्ष रवींद्र बेडकीहाळ म्हणाले की, पोंभुर्ले हे गाव महाराष्ट्रातील पत्रकारांची



पंढरी व्हावी, या भावनेतून हे स्मारक उभारण्यात आले आहे. जांभेकरांची विद्वत्ता, पत्रकारिता व संशोधन क्षेत्रातील महान कार्य आजही मार्गदर्शक आहे. यावेळी जयेंद्र भाटकर यांनी रवींद्र बेडकीहाळ लिखित बाळशास्त्रीचे श्रीखंडात्मक चरित्र हे त्रिखंडात्मक चरित्र विधिमंडळाच्या प्रत्येक सदस्याला भेट देऊन त्यांचे कार्य राज्यभर पोहोचवावे, अशी विनंती सभापतींना केली. याप्रसंगी दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर : कर्तृत्वाचा शोध या त्रिखंडात्मक चरित्राचे लोकार्पण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन विश्वस्त अमर शेंडे यांनी केले. या सोहळ्यास राज्यभरातील पत्रकार व विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लोकसंस्कृतीचा जिवंत उत्सव : आदी लोकोत्सव २५

गोव्याच्या सांस्कृतिक व आदिवासी परंपरेचा समृद्ध वारसा जतन व संवर्धन करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात येणारा रौप्यमहोत्सवी 'आदी लोकोत्सव २५' हा केवळ एक उत्सव नसून, तो लोककला, निसर्ग, क्रीडा, शिक्षण आणि लोकसहभाग यांचा अनोखा व प्रेरणादायी संगम आहे. आदर्श युवा संघ, श्री बलराम शिक्षण संस्था तसेच कला व संस्कृती संचालनालय व आदिवासी संशोधन संस्था, गोवा सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने साकार होत असलेला हा लोकोत्सव आदर्शग्राम आमोणेपैंगीण येथे व्यापक व नियोजनबद्ध तयारीसह आकार घेत आहे. या लोकोत्सवाच्या संकल्पनेमागे आदिवासी जीवनशैली, लोककला, वारली चित्रकला, नृत्य, पारंपरिक वाद्ये आणि ग्रामीण संस्कृती यांचे जिवंत दर्शन भावी पिढीपर्यंत पोहोचवण्याची प्रामाणिक तळमळ आहे. निसर्गाशी सुसंगत रचना, पर्यावरणपूरक सजावट, सुरक्षा व अग्निशमन व्यवस्थेची काटेकोर आखणी, स्वयंसेवकांचा उत्स्फूर्त सहभाग तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांबरोबरच क्रीडा व साहसी उपक्रमांचा समावेश करून हा लोकोत्सव सर्वसमावेशक व बहुआयामी स्वरूपात साजरा केला जात आहे. निसर्गाच्या कुशीत वसलेल्या आदर्शग्राम आमोणेपैंगीण परिसरात साकारत असलेला 'आदी लोकोत्सव२५' जणू आदिवासी संस्कृतीचा जिवंत उत्सवच भासत आहे. प्रवेशद्वारापासूनच लोकसंस्कृतीची अनुभूती मनाला स्पर्श करते. माती, गवत, ताडपत्री व अन्य नैसर्गिक साहित्याने सजवलेली रचना, हिरवळीने नटलेला परिसर आणि पारंपरिक कलांचे दर्शन घडवणारी मांडणी पाहताच पाहुणे लोकसंस्कृतीच्या विश्वात नकळत प्रवेश करतात. मोठ्या वृक्षाभोवती उभारलेला मातीचा चौथरा व त्यावरील आदिवासी नक्षीकाम हे निसर्गपूजा व सांस्कृतिक श्रद्धेचे प्रतीक ठरते. झाड, माती आणि कला यांचा हा त्रिवेणी संगम 'आदी लोकोत्सव'च्या मूळ संकल्पनेला मूर्त रूप देतो. भिंतींवर साकारलेली



वारली चित्रकला आदिवासी जीवनशैलीचे, नृत्याचे, दैनंदिन व्यवहारांचे व सामूहिक जीवनाचे भावस्पर्शी दर्शन घडवते. संपूर्ण परिसरात फिरताना लोककलेचा गंध, ग्रामीण जीवनाची ऊब आणि आदिवासी संस्कृतीचे आत्मीय रूप अनुभवायला मिळते.

**दूरदृष्टीतून साकारलेला लोकोत्सव : डॉ. रमेश तवडकर यांचे योगदान** 'आदी लोकोत्सव२५'च्या यशस्वी वाटचालीमागे मा. कला व संस्कृती मंत्री डॉ. रमेश तवडकर यांची दूरदृष्टी, सातत्यपूर्ण प्रयत्न आणि लोकसंस्कृतीप्रती असलेली निष्ठा केंद्रस्थानी आहे. आदर्श युवा संघाचे संस्थापक अध्यक्ष म्हणून त्यांनी युवकांना संघटित करून लोककला, आदिवासी संस्कृती व ग्रामीण परंपरांचे जतन करण्याचे स्वप्न पाहिले. आज त्या स्वप्नाला व्यापक स्वरूप देत ते आयोजन समितीचे अध्यक्ष म्हणून 'आदी लोकोत्सव२५'चे नेतृत्व करत आहेत. लोकसंस्कृती ही केवळ संग्रहालयात जपण्याची गोष्ट नसून, ती लोकांच्या सहभागातून जिवंत ठेवली पाहिजे, हा त्यांचा ठाम विचार या लोकोत्सवाच्या प्रत्येक पैलूत दिसून येतो. स्थानिक कलाकारांना व्यासपीठ देणे, युवकांना क्रीडा व साहसी उपक्रमांतून संधी उपलब्ध करून देणे, विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करणारी प्रकल्प मांडणी आणि निसर्गस्नेही संकल्पना या सर्व बाबी डॉ. तवडकर यांच्या सांस्कृतिक दृष्टीकोनाचे प्रतिबिंब आहेत.

**या भव्य लोकोत्सवाच्या निमित्ताने मा. मंत्री डॉ. रमेश तवडकर देशभरातील लोकांना आवाहन करत म्हणतात** : ''आदी लोकोत्सव२५ हा गोव्याच्या मातीशी, निसर्गाशी आणि लोकसंस्कृतीशी नाते जोडणारा उत्सव आहे. येथे येऊन केवळ कार्यक्रम पाहू नका, तर आदिवासी जीवनाचा श्वास अनुभवा, लोककलेचा आत्मा ओळखा आणि ग्रामीण संस्कृतीच्या मुळाशी पोहोचा. देशाच्या कानाकोपऱ्यातील नागरिक, कलाकार, विद्यार्थी आणि संस्कृतीप्रेमींनी आपल्या कुटुंबासह आदर्शग्राम आमोणेपैंगीण येथे येऊन या लोकउत्सवाचा अनुभव घ्यावा, हीच मनापासूनची विनंती आहे.



**आलोक मोडक**
मुक्त पत्रकार
८०१०४८०११६

**संस्कृती, क्रीडा व प्रेरणेचा संगम** : लोकोत्सवात लोककलेचे जतन व जिवंत सादरीकरण, पर्यावरणपूरक रचना, सुरक्षा व्यवस्थेचे प्राधान्य, साहसी खेळ, तालुकास्तरीय व राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा, राष्ट्रीय मॅराथॉन तसेच ग्रामीण खेळ यांमुळे हा उत्सव अधिक बहुरंगी ठरत आहे. गोवा क्रीडा प्राधिकरणाच्या सहकार्याने आयोजित स्पर्धांमुळे युवकांचा सहभाग मोठ्या प्रमाणात वाढत आहे. एकूणच, 'आदी लोकोत्सव २५' हा गोव्याच्या लोकसंस्कृतीचा उत्सव, युवकांच्या ऊर्जेचा उत्सव आणि निसर्गाशी नातं घट्ट करणारा उत्सव ठरतो. परंपरा आणि आधुनिकतेचा सुंदर संगम साधणारा हा लोकोत्सव भविष्यातील पिढीसाठी संस्कृती जपण्याचा दीपस्तंभ ठरेल, असा विश्वास या भव्य आयोजनातून निश्चितच निर्माण होतो.




# लोकशाही उत्सव

## अहिल्यानगर महानगरपालिका निवडणूक - २०२५-२६




## माझी भुमिका, आपले प्रगतीपुस्तक



अहिल्यानगर महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीत प्रभाग क्रमांक १४ मधून शिंदेंच्या शिवसेनेकडून उमेदवारी करत असताना माझी भूमिका स्पष्ट, ठाम आणि जबाबदारीची आहे. गेल्या अनेक वर्षांपासून या प्रभागातील नागरिक अनेक मूलभूत प्रश्नांशी झुंज देत आहेत. 'ओपन स्पेस'सारख्या आपल्या हक्काच्या सुविधा दुर्लक्षित राहिल्या, सुरक्षेचा प्रश्न गंभीर झाला आणि नियोजनाअभावी विकास अपुरा ठरला. आज प्रभागातील खुली मैदाने ही केवळ मोकळी जागा नसून ज्येष्ठ नागरिक, महिला, तरुण आणि मुलांसाठी सुरक्षित आणि सुसज्ज केंद्र बनली पाहिजेत, ही माझी ठाम भूमिका आहे. महिलांसाठी सुरक्षित फिरण्याची जागा, योगा सेंटर, ज्येष्ठांसाठी विरंगुळ्याची सोय आणि मुलांसाठी आधुनिक खेळणी हे केवळ आश्वासन नाही, तर नियोजनबद्ध विकासाचे स्वप्न आहे. प्रभागात वाढलेली भटक्या कुत्र्यांची समस्या आणि त्यातून निर्माण होणारा भीतीचा वातावरण हा केवळ नागरिकांचा प्रश्न नाही, तर प्रशासनाच्या उदासीनतेचा परिणाम आहे. नागरिकांना सुरक्षितता हवी आहे, शांतता हवी आहे आणि जबाबदार प्रतिनिधी हवा आहे. हा विश्वास निर्माण करण्यासाठी केवळ बोलणे नव्हे, तर कृती आवश्यक आहे. पर्याय नसल्यामुळे नव्हे, तर सक्षम आणि विश्वासार्ह पर्याय म्हणून मी आज निवडणुकीच्या मैदानात उभी आहे. उच्चशिक्षित, कायद्याची जाण असलेले मार्गदर्शक, आणि समाजासाठी २४३६५ कार्यरत राहण्याची तयारी याच बळावर ही उमेदवारी आहे. हा लढा व्यक्तीसाठी नाही, तर प्रभागाच्या भविष्यासाठी आहे. शिवसेनेची विचारधारा, जनतेशी असलेली नाळ आणि विकासाची स्पष्ट दिशा घेऊन मी नागरिकांसमोर आले आहे. ही निवडणूक केवळ मतांची नाही, तर विश्वासाची आहे. आणि हा विश्वास जपण्याची जबाबदारी मी पूर्ण प्रामाणिकपणे निभावणार आहे.

**प्रभाग क्रमांक १४ क**
**सौ.श्रुतिका हरीश भांबरे**
**शिवसेना शिंदे गटाच्या उमेदवार**

# जनतेच्या प्रश्नांसाठी शिवसेनेला संधी द्या- कवडे

## शिवसेना उमेदवारांचे जोरदार शक्तीप्रदर्शन

**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाच्या वतीने प्रभाग क्रमांक ११ मधील उमेदवारांच्या प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला. या निमित्ताने नालेगाव परिसरातून रॅली काढण्यात येत शिवसैनिकांनी जोरदार शक्तीप्रदर्शन केले. प्रभाग क्रमांक ११ मधून शिवसेना (शिंदे गट)कडून उमेश (गणेश) खंडेराव कवडे (अ), सुनिता संतोष गेनप्पा (ब), वैष्णवी सतीश मैड (क) व नरेंद्र सच्चिदानंद कुलकर्णी (ड) हे उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत.




या उमेदवारांच्या प्रचारार्थ काढण्यात आलेल्या रॅलीत शिवसैनिक, पदाधिकारी व समर्थक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. नालेगाव परिसरातून मार्गक्रमण करत रॅलीदरम्यान उमेदवारांनी घरोघरी जाऊन मतदारांशी थेट संवाद साधला. ढोल-ताशांच्या गजरात काढण्यात आलेल्या मिरवणुकीमुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. शिवसेनेचे अधिकृत चिन्ह धनुष्यबाण व भगवे ध्वज हातात घेऊन कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी केली. उमेश (गणेश) कवडे म्हणाले की, प्रभाग क्रमांक ११ हा शिवसेनेचा पारंपरिक बालेकिल्ला राहिला आहे. स्व. अनिल राठोड यांच्या विचारांवर विश्वास ठेवणारा मोठा जनसमुदाय या भागात आहे. त्या विचारांना पुढे घेऊन शिवसेनेचे सर्व उमेदवार निवडणुकीच्या मैदानात उतरले आहेत. महापालिकेत नगरसेवक तसेच स्थायी समितीचे सभापती म्हणून काम करताना प्रभागातील अनेक प्रलंबित प्रश्न मार्गी लावल्याचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न सोडविणे व त्यांच्या हाकेला तत्काळ धावून जाणे हेच आमचे प्रमुख उद्दिष्ट आहे. त्यामुळे आगामी निवडणुकीत नागरिकांनी पुन्हा एकदा शिवसेनेच्या सर्व उमेदवारांना संधी द्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

# टक्केवारीच्या राजकारणामुळे प्रभागाचा विकास रखडला - खाकाळ

## प्रभाग ७ मधून 'आप'ची एन्ट्री



**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण तापले असताना आम आदमी पार्टी (आप)ने निवडणूक रिंगणात दमदार एन्ट्री केली आहे. प्रभाग क्रमांक ७ ड मधून 'आप'चे उमेदवार भरत खाकाळ यांनी प्रचाराला वेग देत समर्थकांसह प्रचार रॅली काढली. ढोल-ताशांचा गजर, घोषणाबाजी आणि कार्यकर्त्यांच्या उत्साहात ही रॅली प्रभागातील विविध भागांतून काढण्यात आली. ''प्रभागाचा विकास, स्वच्छ प्रशासन'' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. रॅलीनंतर उमेदवार व कार्यकर्त्यांनी घरोघरी जाऊन मतदारांशी थेट संवाद साधला. पाणी, रस्ते, स्वच्छता, आरोग्य आदी मूलभूत सुविधांबाबत नागरिकांच्या तक्रारी ऐकून घेण्यात आल्या. 'आप'च्या वतीने पाणीपुरवठा, रस्ते, कचरा व्यवस्थापन, आरोग्य सेवा, शाळा व सार्वजनिक सुविधांवर ठोस काम करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. दिल्लीसह इतर राज्यांतील कामगिरीचा दाखला देत अहिल्यानगरमध्येही पारदर्शक व लोकाभिमुख प्रशासन देण्याचा विश्वास उमेदवारांनी व्यक्त केला.

**भरत खाकाळ म्हणाले की, टक्केवारीच्या राजकारणामुळे प्रभागाचा विकास रखडला आहे. सत्ताधारी आधी स्वतःचा विकास साधतात आणि नंतर प्रभागाकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे सर्वसामान्यांच्या प्रश्नांना न्याय मिळत नाही. प्रभागातील प्रश्न कायमस्वरूपी सोडवण्यासाठी स्वच्छ प्रतिमा, अभ्यासू व निष्कलंक उमेदवार निवडून देण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.**



# धनशक्ती, दडपशाहीविरोधात जनशक्तीचा विजय निश्चित- खा. निलेश लंके

## महाविकास आघाडीच्या प्रचाराचा शुभारंभ

**अहमदनगर । रयत समाचार**


महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केडगाव परिसरात महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचाराचा ढोल-ताशांच्या गजरात शुभारंभ करण्यात आला. केडगाव येथील रेणुका माता मंदिरात निलेश लंके यांच्या हस्ते नारळ वाढवून प्रभाग क्रमांक १७ मधील महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचाराची औपचारिक सुरुवात झाली. यावेळी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उमेदवार कांबळे सिद्धांत संजय (अ) व भाले अलका बालकृष्ण (ब), तसेच राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या उमेदवार जाधव आशा किशोर (क) यांच्या प्रचारार्थ खासदार निलेश लंके यांच्या उपस्थितीत भव्य प्रचार रॅली काढण्यात आली. प्रचार रॅलीदरम्यान उमेदवारांसह खासदार निलेश लंके, शिवसेनेचे शहराध्यक्ष किरण काळे, शिवसेना संपर्कप्रमुख राजेंद्र दळवी, प्रतीक भाले, राव नांगरे, संजय कांबळे आदींनी घराघरांत जाऊन मतदारांच्या गाठीभेटी घेतल्या. उपनगरातील नागरिकांनी महाविकास आघाडीच्या उमेदवारांना उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. प्रचारात कार्यकर्ते, समर्थक व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. खासदार निलेश लंके म्हणाले की, ही निवडणूक धनशक्ती व दडपशाहीविरोधात जनशक्तीची आहे. सर्वसामान्य उमेदवारांवर दहशत केली जात आहे. भयमुक्तीसाठी नागरिकांनी निवडणूक आपल्या हातात घेऊन चांगल्या उमेदवारांना निवडून देण्याची गरज आहे. सर्वसामान्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणारे, जनतेशी थेट नाते असणारे उमेदवार महाविकास आघाडीने दिले असून, अशाच उमेदवारांना निवडून देण्याचे त्यांनी आवाहन केले.

# मतदार जनजागृतीसाठी 'स्वीप धुरंधर' पुरस्कार

**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीत १०० टक्के मतदान व मतदार जनजागृतीसाठी मनपा स्वीप समितीच्या वतीने 'स्वीप धुरंधर' पुरस्कार आयोजित करण्यात आला आहे. अतिरिक्त आयुक्त विजयकुमार मुंढे यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविला जात असून, व्यक्ती, संस्था, कार्यालये तसेच शाळा-महाविद्यालयांनी प्रस्ताव पाठवावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. सक्षम, दिव्यांग, ज्येष्ठ, महिला, तृतीयपंथी मतदार, ईव्हीएम व टपाली मतदान, नवमतदार युवक-युवतींचा सहभाग, कमी मतदान असलेल्या भागातील उपाययोजना आदी विषयांवर उपक्रम अपेक्षित आहेत. निबंध, चित्रकला, पथनाट्य, रॅली, सोशल मीडिया जनजागृती, व्हिडिओ/रील निर्मिती यांसारख्या स्पर्धांचा समावेश आहे. सर्व उपक्रम आदर्श आचारसंहितेनुसार व राजकीय निरपेक्ष असावेत. निवडणूक अधिकारी तथा मनपा आयुक्त व प्रशासक यशवंत डांगे यांनी सांगितले की, सर्जनशील आणि आकर्षक उपक्रमांमुळे मतदारांमध्ये उत्सुकता वाढत आहे. प्रस्ताव छायाचित्रे, कात्रणे व तपशीलासह स्वीपनगरी, नवीन मनपा प्रशासकीय इमारत, अहिल्यानगर येथे जमा करावेत. अधिक माहितीसाठी जिल्हा मतदारदूत डॉ. अमोल बागुल (९५९५५४५५५५) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# निवडणूक प्रक्रियेची तयारी अंतिम टप्प्यात; प्रशिक्षण संपन्न



**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर निवडणूक प्रक्रिया अधिक सक्षम, पारदर्शक व सुरळीत पार पाडण्यासाठी महापालिकेच्या कर्मचाऱ्यांसाठी विशेष प्रशिक्षण वर्गांचे आयोजन करण्यात आले होते. हे प्रशिक्षण वर्ग शहरातील माऊली सभागृह, सहकार सभागृह तसेच नंदनवन लॉन येथे यशस्वीपणे पार पडले. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून निवडणुकीदरम्यान पार पाडावयाच्या सर्व जबाबदाऱ्यांबाबत कर्मचाऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. मतदानाच्या दिवशी मतदान यंत्रे हाताळण्याची पद्धत, मतदान प्रक्रियेदरम्यान घ्यावयाची खबरदारी तसेच मतदारांना कोणतीही अडचण येऊ नये यासाठी करावयाच्या उपाययोजनांबाबत स्पष्ट सूचना देण्यात आल्या. यावेळी आरो अधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांना संबोधित करताना मतदान प्रक्रिया पूर्णपणे नियमबद्ध, निष्पक्ष व पारदर्शक ठेवण्याची जबाबदारी प्रत्येक कर्मचाऱ्यावर असल्याचे स्पष्ट केले. मतदान केंद्रावरील शिस्त, वेळेचे नियोजन, मतदारांना मार्गदर्शन तसेच आपत्कालीन परिस्थितीत घ्यावयाच्या निर्णयांबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. या प्रशिक्षण वर्गास निवडणूक अधिकारी व आयुक्त यशवंत डांगे उपस्थित होते. त्यांनी कर्मचाऱ्यांना संबोधित करताना सांगितले की, निवडणूक ही लोकशाहीची सर्वात मोठी प्रक्रिया असून ती विश्वासार्ह व पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यासाठी कर्मचाऱ्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. प्रत्येक कर्मचाऱ्याने आपली जबाबदारी गांभीर्याने पार पाडावी, असे आवाहन त्यांनी केले. या प्रशिक्षण वर्गामुळे निवडणूक प्रक्रियेसाठी नियुक्त कर्मचाऱ्यांचा आत्मविश्वास वाढला असून, अहिल्यानगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ ही अधिक सुरळीत, सुरक्षित व पारदर्शक पद्धतीने पार पडेल, असा विश्वास प्रशासनाकडून व्यक्त करण्यात आला आहे.


## रयत समाचार Classified छोटी जाहिरात

### छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक




✲ अधिक माहितीसाठी संपर्क ✲
9049860184, 8208235485

निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
**जगदंबा टी सेंटर**
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

**हॉटेल भाड्याने देणे**
नगर-सोलापूर हायवेपासून पाच मिनिटांच्या अंतरावर असणाऱ्या कानडेमळा येथील सारसनगर चौकातील सुस्थितीत असणारे हॉटेल भाड्याने चालविण्यास देणे आहे. किमान ३० ते ५० लोक एकावेळी बसतील अशी पीओपी आणि लाईट फिटिंगसह बैठक व्यवस्था, व्हेज-नॉन, व्हेजसाठी स्वतंत्र किचन, सर्व किचन साहित्य टेबल, सोफे, पाण्याची व्यवस्था इत्यादीसह देणे आहे.
- संपर्क -
९०११११३७००

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० । ७७७४००१८०० । ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा


हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# देवगड विद्यालयात विविध गुणदर्शन कार्यक्रमाचे आयोजन

## अभिनेत्री कुमारी पावसे कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण

**संगमनेर । नितीन भालेराव**

जनता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित देवगड विद्यालय, हिवरगाव पावसा येथे बालगोपाळांच्या विविध गुणदर्शन व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे सादरीकरण असलेला हा कार्यक्रम गुरुवार, ता. ८ जानेवारी रोजी सायं. ७.३० वाजता होणार असून, गुणदर्शन कार्यक्रमाचे उद्घाटन सह्याद्री वाहिनीवरील दामिनी २.० मालिका फेम अभिनेत्री कुमारी किरण पावसे यांच्या हस्ते होणार आहे.



गावाला कला व संस्कृतीचा समृद्ध वारसा लाभलेला आहे. महाराष्ट्राच्या लोककलेत लावणीला मोठी उंची मिळवून देणारे पवळा भालेराव हिवरगावकर यांची ही जन्मभूमी आहे. 'गाढवाचे लग्न' फेम दिवंगत कलाभूषण लहुजी भालेराव तसेच चित्रपट क्षेत्रात कार्यरत असलेले हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे या चित्रपटाचे क्रिएटिव्ह प्रोड्यूसर मंगेश भालेराव यांनी टायगर पॉज फिल्म कंपनीच्या माध्यमातून शेकडो चित्रपटांची निर्मिती केली आहे. त्यानंतर छोट्या पडद्यावर आपल्या अभिनयाची ठळक छाप उमटवणाऱ्या हिवरगाव पावसा गावच्या सुकन्या अभिनेत्री कुमारी किरण पावसे यांनी दामिनी २.० मालिकेमुळे गावाचे नाव कला क्षेत्रात उज्ज्वल केले आहे. अभिनेत्री कुमारी किरण पावसे यांच्या उपस्थितीत होणाऱ्या या गुणदर्शन कार्यक्रमाबाबत पंचक्रोशीत विद्यार्थी व नागरिकांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. सदर कार्यक्रम जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे सर्व पदाधिकारी, हिवरगाव पावसा व पंचक्रोशीतील विविध संस्थांचे पदाधिकारी, ग्रामस्थ, पालक व माजी विद्यार्थी यांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. शालेय विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी व त्यांचा आनंद द्विगुणित करण्यासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन देवगड माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सुनंदा उगले, सहशिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी केले आहे.

# संवादाअभावी विद्यार्थी असुरक्षित- चव्हाण

## अगस्ती विद्यालयाचा पारितोषिक समारंभ उत्साहात

**अकोले । सतीश पाचपुते**

येथील श्री अगस्ती एज्युकेशन सोसायटीच्या अगस्ती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा ६० वा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ मोठ्या उत्साहात, संस्थेच्या सेक्रेटरी शैलजा पोखरकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. विद्यालयाने नुकतीच हिरकमहोत्सवाकडे वाटचाल केली असून, वेब सिरीज व मराठी सिने अभिनेत्री अपेक्षा चव्हाण यांच्या हस्ते पारितोषिकांचे वितरण करण्यात आले.



यावेळी सिने दिग्दर्शक रविंद्र निंबाळकर, एम.के. स्टुडिओचे मालक व चित्रपट निर्माते मच्छिंद्र धुमाळ, बालकलाकार शुभम सावंत, कार्यकारी निर्माता महेश नाईक, अभिनेते विराज लटके व पटकथा लेखक संकेत आवळे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविकात प्राचार्य मंगेश खांबेकर यांनी विद्यालयाच्या यशाचा वाढता आलेख मांडत, थोर स्वातंत्र्यसेनानी गुरुवर्य बा. ह. नाईकवाडी (बाबा) यांच्या त्याग, समर्पण, सचोटी व जिद्दीमुळे संस्था सर्व क्षेत्रांत प्रगतीपथावर गेल्याचे नमूद केले. तसेच संस्थेच्या भूतपूर्व सेक्रेटरी स्व. दुर्गाबाई नाईकवाडी (आई) यांच्या आयुष्यभराच्या समर्पणाची प्रेरणा आजही मार्गदर्शक असल्याचे सांगितले. अहवाल वाचनात पोपट सदगीर यांनी तालुका, जिल्हा, विभाग व राज्य पातळीवरील विद्यालयाची कामगिरी सादर केली.

विविध परीक्षा, एस.एस.सी. व एच.एस. सी. निकालातील गुणवंत विद्यार्थ्यांचा चढता आलेख 'गुणवत्ता हेच आमचे ब्रीद' या तत्त्वानुसार मांडण्यात आला. प्रमुख पाहुण्या अपेक्षा चव्हाण यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांना प्रोत्साहन दिले. संवादाअभावी विद्यार्थी असुरक्षित होत असल्याने शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांमध्ये निखळ संवाद आवश्यक असल्याचे सांगत, मोबाईलपेक्षा खेळ, व्यासंग व छंदांना प्राधान्य देण्याचे आवाहन त्यांनी केले. अध्यक्षीय भाषणात शैलजा पोखरकर यांनी एस.एस.सी. परीक्षेत संस्थेचे विद्यार्थी सातत्याने तालुक्यात अव्वल स्थानी राहिल्याचा इतिहास अधोरेखित करत, बाबांनी उभा केलेला ज्ञानयज्ञ अखंड सुरू ठेवण्यासाठी अधिक सजग राहण्याचे आवाहन केले. शालेय, तालुका, जिल्हा, विभाग व राज्य स्तरावरील सांस्कृतिक, कला, क्रीडा, वाङ्मय, गणित-विज्ञान आदी बक्षिसांचे वितरण करण्यात आले.

पारितोषिक वितरण वाचन संजय पवार, विजय उगले, निशांत बिबवे व विनोद नवले यांनी केले. तालुक्यातील एस.एस. सी. परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास संस्थेचे कार्याध्यक्ष शिरीष नाईकवाडी, सतीश नाईकवाडी, पत्रकार विजय पोखरकर, डॉ. निलेश सहाणे, माधवराव तिटमे, सचिन शिंदे, गिरीश नवले, सेवानिवृत्त शिक्षक भाऊसाहेब पारदे, लक्ष्मण आव्हाड, दिलीप शेणकर, सुरेश कोकणे, आर.टी. सोनवणे यांच्यासह आजी-माजी कर्मचारी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. अध्यक्षीय सूचना पद्मा भारती यांनी मांडली व अनुमोदन सुनिता नाईकवाडी यांनी दिले.

सूत्रसंचालन प्रकाश आरोटे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय रामचंद्र आवारी यांनी करून दिला तर आभार पर्यवेक्षक नंदा गोपाळे यांनी मानले.

# जायकवाडी प्रकल्पग्रस्त पुनर्वसित गावांसाठी ५ कोटींचा निधी

## शेवगाव तालुक्यात रस्ते विकासाला गती

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

जायकवाडी प्रकल्पामुळे (नाथसागर जलाशय) १९७० च्या दशकात शेवगाव तालुक्यातील अनेक गावे पूर्णतः अथवा अंशतः बाधित झाली होती. या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसित गावठाणांमध्ये मूलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आमदार मोनिका राजळे यांच्या पाठपुराव्यामुळे विकासकामांना गती मिळाली आहे. महसूल व वन विभागाच्या ता. ६ जानेवारी २०२६ च्या शासन निर्णयानुसार या गावांसाठी सुमारे ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीतून पुनर्वसित गावांमधील रस्त्यांचे मजबुतीकरण व डांबरीकरण, तसेच गावांतर्गत काँक्रीटीकरणाची कामे करण्यात येणार आहेत. मौजे सोनविहीर येथे सोनुबाई मंदिर ते पहिलवानबाबा मंदिर रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरणासाठी २ कोटी रुपये, मौजे कऱ्हेटाकळी अंतर्गत कऱ्हेटाकळी ते खानापूर लिफ्ट रस्ता यासाठी १ कोटी ४५ लाख रुपये, मौजे लाखेफळ अंतर्गत लाखेफळ ते जुने दहिफळ रस्ता यासाठी १ कोटी २१ लाख रुपये, तर मौजे खानापूर येथे गावांतर्गत रस्त्यांच्या काँक्रीटीकरणासाठी २९ लाख ८८ हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.



एकूण ४ कोटी ९७ लाख रुपयांचा निधी या कामांसाठी उपलब्ध झाला आहे. आ. मोनिका राजळे यांच्या ता. ८ नोव्हेंबर २०२२ रोजीच्या पत्रानुसार या सर्व कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून, निविदा प्रक्रिया पूर्ण करून तातडीने कार्यारंभ आदेश देण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या आहेत. या विकासकामांमुळे प्रकल्पग्रस्त पुनर्वसित गावांतील नागरिकांच्या दळणवळणाच्या अडचणी दूर होऊन जीवनमान उंचावण्यास मदत होणार आहे. दरम्यान, या निधी मंजुरीसाठी आ. मोनिका राजळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील तसेच पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आभार मानले आहेत.

# स्नेहालयकडून जागतिक एड्स दिनानिमित्त जनजागृती कार्यक्रम

**राहुरी । दत्ता जोगदंड**

स्नेहालय संस्थेच्या वतीने काल बुधवार, ता. ७ जानेवारी २०२६ जागतिक एड्स दिनानिमित्त जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. राहुरी बस स्टँड व अण्णाभाऊ साठे चौक या ठिकाणी सदर कार्यक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमात कलापथकाच्या माध्यमातून नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली.



यावेळी एचआयव्ही/एड्सविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. एचआयव्ही होण्याची कारणे, लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाय तसेच एचआयव्ही झाल्यास घाबरून न जाता योग्य उपचार व मार्गदर्शन घेण्याचे महत्त्व उपस्थितांना समजावून सांगण्यात आले. कार्यक्रमात नगरसेवक सोन्याबापू जगधने, नगरसेवक निलेश जगधने, सामाजिक कार्यकर्ते ज्ञानेश्वर जगधने, पत्रकार संघाचे अध्यक्ष दत्तात्रेय जोगदंड तसेच ग्रामीण रुग्णालयाच्या अश्विनी घोरपडे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी स्नेहालयचे कार्यक्षेत्र अधिकारी परवेज आतार, तसेच साइटवर कार्यरत पियर एज्युकेटर शेखर वाघ व मयूर लेकुळे उपस्थित होते. या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये एचआयव्ही/एड्सविषयी जागरूकता वाढल्याचे चित्र पाहायला मिळाले.



**पत्रकार दिनानिमित्त अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांच्या हस्ते पत्रकार अनिल पांडे, नवनाथ कुताळ, राजेंद्र बोरसे, महेश माळवे, प्रदीप आहेर, सलीमखान पठाण व सचिन उघडे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी पोलीस उपाधीक्षक जयदत्त भवर व पोलीस निरीक्षक नितीन देशमुख उपस्थित होते.**

**(छाया : एक्सप्रेस फोटो)**






# जागतिक शैक्षणिक सहकार्याला बळ

## यूआयटीएम-केदाह कॅम्पस व सोमैया महाविद्यालयाचा करार नूतनीकरण

**कोपरगाव । किसन पवार**

मलेशियातील युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नोलॉजी मारा (यूआयटीएम) केदाह कॅम्पस आणि के. जे. सोमैया कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कोपरगाव यांच्यातील आंतरराष्ट्रीय शैक्षणिक सहकार्य अधिक व्यापक व परिणामकारक करण्याच्या दृष्टीने सामंजस्य कराराचे नूतनीकरण करण्यात आले आहे. हा करार प्रथम २०२२ मध्ये तीन वर्षांसाठी करण्यात आला होता. दोन्ही संस्थांमधील यशस्वी व फलदायी सहकार्याचा अनुभव लक्षात घेऊन आता हा करार पुढील पाच वर्षांसाठी वाढविण्यात आला असल्याची माहिती प्राचार्य डॉ. विजय ठाणगे यांनी दिली. या कराराच्या माध्यमातून दोन्ही संस्थांमध्ये संयुक्त शैक्षणिक व संशोधन उपक्रम, विद्यार्थी व प्राध्यापक आदान-प्रदान कार्यक्रम, कार्यशाळा, व्याख्यानमाला तसेच सांस्कृतिक देवाणघेवाण अधिक प्रभावीपणे राबविण्यात येणार आहेत. आतापर्यंत या करारांतर्गत आंतरसंस्कृती कार्यक्रम, दोन आंतरराष्ट्रीय परिषदा, विविध कार्यशाळा, विद्यार्थी आदान-प्रदान उपक्रम, लेक्चर सिरीज व गेस्ट लेक्चर्स असे अनेक उपक्रम यशस्वीरीत्या पार पडले आहेत. या सर्व उपक्रमांना दोन्ही संस्थांतील प्राध्यापक व विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, त्याच यशाच्या जोरावर कराराचे नूतनीकरण करण्यात आले आहे. करार नूतनीकरणप्रसंगी यूआयटीएम मारा विद्यापीठाच्या रेक्टर प्रा. रोशिमा सईद, डॉ. जुनेदा इस्माईल, के. जे. सोमैया महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय ठाणगे, सामंजस्य कराराच्या समन्वयक सियाझलियाती इब्राहिम, तसेच डॉ. रवींद्र जाधव व डॉ. शंकर कोंडा यांची प्रमुख उपस्थिती होती. हा करार राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील शिक्षणाच्या आंतरराष्ट्रीयीकरणाच्या उद्दिष्टांना बळ देणारा असून, आंतरराष्ट्रीय शैक्षणिक सहकार्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे. के. जे. सोमैया महाविद्यालयाचे फिलिपिन्स, दक्षिण आफ्रिका, इंडोनेशिया, अफगाणिस्तान, कोलंबिया, ग्रीस, थायलंड, नेपाळ आदी देशांतील नामांकित संस्थांशी सुरू असलेले शैक्षणिक व संशोधनात्मक उपक्रम महाविद्यालयाची जागतिक पातळीवरील ओळख अधिक दृढ करीत असल्याचे समन्वयक डॉ. रवींद्र जाधव यांनी नमूद केले. दरम्यान, स्थानिक मूल्ये जपत जागतिक स्तरावर अर्थपूर्ण व दीर्घकालीन शैक्षणिक संबंध प्रस्थापित करण्याच्या दिशेने हा करार महत्त्वपूर्ण ठरणार असल्याची प्रतिक्रिया प्राचार्य डॉ. विजय ठाणगे यांनी व्यक्त केली.

## राष्ट्रीय ग्राहक दिनास शासकीय-निमशासकीय प्रतिनिधींची पाठ

# अनुपस्थित विभागातील अधिकाऱ्यांची योग्य दखल घेऊ-तहसीलदार डोंगरे

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

श्रीगोंदा तहसील कार्यालयात ६ जानेवारी रोजी राष्ट्रीय ग्राहक दिनाचे आयोजन करण्यात आले होते. तहसीलदार सचिन डोंगरे यांच्या प्रमुख उपस्थितीत २४ डिसेंबरचा ग्राहक दिन ६ जानेवारी रोजी साजरा करण्यात आला. मात्र तालुक्यातील केवळ चार शासकीय विभागांचे प्रतिनिधी उपस्थित राहिले, तर अन्य विभागांनी पाठ फिरवल्याने अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे पदाधिकारी आक्रमक झाले. यावेळी तहसीलदार सचिन डोंगरे यांनी पुढील १५ मार्च २०२६ रोजी होणारा जागतिक ग्राहक दिन उत्तम प्रकारे साजरा केला जाईल, तालुक्यातील सर्व शासकीय-निमशासकीय विभागांचे प्रमुख किंवा त्यांचे प्रतिनिधी शंभर टक्के उपस्थित राहतील, यासाठी संबंधितांना योग्य सूचना दिल्या जातील, अशी ग्वाही दिली. यानंतर उपस्थित ग्राहक पंचायतीचे पदाधिकारी शांत झाले. ग्राहक दिन हा ग्राहकांच्या हितासाठी असतो. या माध्यमातून शासकीय व निमशासकीय कार्यालयांतील प्रलंबित समस्या मार्गी लावल्या जातात. मात्र अनेक विभागांचे प्रतिनिधी अनुपस्थित राहिल्याने तक्रारी घेऊन आलेल्या ग्राहकांनी दाद कुणाकडे मागावी,



**यापुढे ग्राहक दिन कार्यक्रमास सहकार्य करणार नाही**

**अनुपस्थित शासकीय-निमशासकीय अधिकाऱ्यांवर तीव्र शब्दांत टीका करत, यापुढे असेच घडल्यास ग्राहक पंचायतीचे पदाधिकारी कोणत्याही ग्राहक दिनास सहकार्य करणार नाहीत, तसेच प्रसंगी कार्यालयांसमोर आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा दिला.**

– **जितेंद्र पितळे**, जिल्हा सचिव, ग्राहक पंचायत

असा सवाल ग्राहक पंचायतीच्या पदाधिकाऱ्यांनी उपस्थित केला. यावेळी संतोष भोसले यांनी आदिवासी व भटक्या-विमुक्त समाजाला अन्नसुरक्षा योजनेचा लाभ न मिळाल्याबाबत नाराजी व्यक्त केली. प्रदीप डहाळे यांनी श्रीगोंदा एसटी डेपोच्या सेवांबाबत तक्रार करत माहिती अधिकारात अर्ज देऊनही १८ महिने माहिती न मिळाल्याने उपोषणाचा इशारा दिला. संतोष जठार यांनी श्रीगोंदा-शिरूर रस्त्याची दुरवस्था, अपघातांची मालिका व दळणवळण विस्कळीत झाल्याचा मुद्दा उपस्थित केला. ग्राहक पंचायतीचे मदन गडदे, दत्तात्रय हिरडे, जयश्री औटी, संतोष जठार, रामदास कुसाळकर, माऊली वाडगे यांनी विविध समस्यांचा पाढा वाचला. अनंता पवार यांनी तहसील कार्यालय व तलाठी कार्यालयांच्या सुविधांचा अभाव, शौचालयांची अडचण तसेच कृषी सेवा केंद्रांतील खत टंचाईकडे लक्ष वेधले. तहसीलदार सचिन डोंगरे यांनी उपस्थित प्रश्नांना समर्पक उत्तरे देत १५ मार्च रोजी होणारा जागतिक ग्राहक दिन सर्व विभागांच्या उपस्थितीत साजरा करण्याची पुनःश्च ग्वाही दिली. या राष्ट्रीय ग्राहक दिनास स्वस्त धान्य दुकानदार संघटनेचे जिल्हाध्यक्ष सतीश हिरडे, मदन गडदे, किशोर शिंदे, अनंता पवार, माऊली वाडगे, गणेश लाढाणे, संतोष बापू गलांडे, सुरेश दांडेकर, बहादूर सिंग, ज्येष्ठ पत्रकार नंदकुमार कुरुमकर, दत्ताजी जगताप, पुरवठा निरीक्षक गजानन बंडगर, पुरवठा लिपिक गणेश काळे, श्रीमती भाग्यश्री सव्वाशे यांच्यासह ग्राहक व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक व आभार प्रा. विजय निंभोरे यांनी केले.

# पतंगराव नव्हे रॉकेटराव

महाराष्ट्रातील राजकारणात जवळपास तीस वर्ष आपल्या कर्तुत्वाचा ठसा उमविणारे अजातशत्रू व्यक्तिमत्व असलेले काँग्रेसचे जेष्ठ नेते, महाराष्ट्राचे माजी मंत्री पतंगराव कदम यांची आज ८२ वी जयंती. ८२ वर्षापूर्वी आजच्याच दिवशी म्हणजे ८ जानेवारी १९४४ रोजी पतंगराव कदम यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील सोनसळ या गावात एका गरीब कुटुंबात झाला. त्यांचे चौथी पर्यंतचे शिक्षण गावातल्या शाळेत झाले तर सातवी पर्यंतचे शिक्षण शिरसगाव या गावात झाले. ११ वी पर्यंतचे शिक्षण म्हणजे त्या काळातील मॅट्रिक पर्यंतचे शिक्षण त्यांनी कमवा व शिका योजनेअंतर्गत पूर्ण केले. एफवायबीए नंतर त्यांनी टीचर्स डिप्लोमा पूर्ण केला व शिक्षक होण्याचे स्वप्न उराशी बांधून पुणे गाठले. पुण्यातील हडपसर येथे दहा बाय दहाच्या पत्र्याच्या खोलीत राहून त्यांनी गोरगरिबांच्या मुलांना शिकवण्याचे काम सुरू केले. शिक्षक असतानाच गोरगरिबांच्या मुलांना उच्च शिक्षण मिळावे यासाठी काही तरी करावे असा विचार त्यांच्या मनात येऊ लागला त्यातूनच , भारती विद्यापीठाची मुहूर्तमेढ रोवली गेली. बा. ग पवार, वसंतराव म्हेत्रे, महादर, नीलाखे अशा पाच लोकांना घेऊन त्यांनी १० मे १९६४ रोजी भारती विद्यापीठाची स्थापना केली. त्यावेळी त्यांच्या खिशात अवघे ३८ रुपये होते. हळूहळू भारती विदयापीठाचा विस्तार वाढू लागला. शहराप्रमाणे ग्रामीण भागातही भारती विद्यापीठाच्या पाट्या झळकू लागल्या. भारती विद्यापीठामुळे गोरगरिबांच्या मुलांना इंग्रजीतून शिक्षण मिळू लागले. सर्वसामान्य कुटुंबातील मुले उच्च शिक्षण घेऊ लागली. त्यांनी लावलेल्या भारती विद्यापीठाच्या रोपट्याचे आज वटवृक्ष बनले आहे. के.जी ते पी.जे असे सर्वप्रकारचे शिक्षण आज भारती विद्यापीठातून मिळत आहे. शैक्षणिक क्षेत्रात त्यांनी केलेले कार्य महान असेच आहे.



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

समाजसंवाद

भारती विद्यापीठाचा पसारा सांभाळीत त्यांनी राजकारणातही ठसा उमटविला. १९६८ साली एस टी महामंडळाच्या सदस्यपदी त्यांची निवड झाली. गाव तिथे एस टी ही योजना राबवून त्यांनी गावागावात एस टी पोहचवली. १९८५ साली त्यांनी अपक्ष म्हणून विधानसभेची निवडणूक लढवली. त्यात ते विजयी झाले. १९९० सालच्या विधानसभा निवडणुकीत त्यांना काँग्रेसने त्यांना तिकीट दिले तेंव्हापासून १९९५ सालचा अपवाद वगळता ते सतत निवडून आले. २०१४ साली मोदी लाटेत अनेक दिग्गज नेत्यांचा पराभव झाला पण त्यांनी आपला गड राखला. या दरम्यान त्यांनी शिक्षण, सहकार, उद्योग, महसूल, वन या महत्वाच्या खात्याची मंत्रीपदे सांभाळली. इतकी वर्ष मंत्रीपदावर राहूनही त्यांच्यावर एकही आरोप झाला नाही यातच त्यांचा कारभार किती पारदर्शक होता, हे दिसून येते.

काँग्रेस पक्षावर त्यांची नितांत श्रद्धा होती. सत्ता असो वा नसो काँग्रेस पक्षाशी ते कायम एकनिष्ठ राहिले. प्रत्येकवेळी मुख्यमंत्र्यांच्या स्पर्धेत त्यांचे नाव कायम चर्चेत असायचे, पण दुर्दैवाने ते मुख्यमंत्री बनू शकले नाही. तरीही त्यांनी याबाबत कधीही जाहीर नाराजी व्यक्त केली नाही. पक्ष सोडण्याचा विचारही त्यांच्या मनात कधी आला नाही. आजच्या आयाराम गयाराम संस्कृतीत पतंगरावांची निष्ठा उठून दिसते. पतंगराव तरुण पिढीसाठी मार्गदर्शक आहेत.

बेधडक आणि मनमोकळा स्वभाव हे त्यांचे वैशिष्ट्य होते. ओठात एक आणि पोटात एक असे पतंगरावांच्या बाबतीत कधीच झाले नाही. खऱ्याला खरे आणि खोट्याला खोटे म्हणण्याची त्यांची वृत्ती राजकारणात अभावानेच पाहायला मिळते. त्यांचे भाषण म्हणजे पर्वणीच. त्यांच्या भाषणात गावाकडचा रांगडेपणा असायचा. कार्यकर्त्यांचा गराडा कायम त्यांच्यासोबत असायचा. उद्घाटनाच्या कार्यक्रमाला पतंगरावांनाच बोलवायचे असा कार्यकर्त्यांचा आग्रह असायचा.

त्यांच्या कामाचा धडाका देखील जबरदस्त असायचा. आपल्या मतदारसंघात त्यांनी कामाचा डोंगर उभा केला होता. आपल्या मतदारसंघात एमआयडीसी उभारून त्यांनी अनेक उद्योगधंदे आणले. सूत गिरण्या, साखर कारखाने, वाईन पार्क, भारती विद्यापीठ, भारती हॉस्पिटल उभारून मोठ्या प्रमाणात उद्योग निर्मिती केली. त्यांच्या कामाचा झपाटा इतका असायचा की, एकदा पु. ल. देशपांडे म्हणाले की, हे पतंगराव नव्हेत तर रॉकेटराव आहेत. पतंगराव कदम यांनी सहकार क्षेत्रातही आपला ठसा उमटविला. ९ मार्च २०१८ रोजी पतंगराव कदम यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने महाराष्ट्रातील एक असामान्य व्यक्तिमत्व काळाच्या पडदयाआड गेले. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राची मोठी हानी झाली. पतंगराव कदम यांना ८२ व्या जयंतीदिनी विनम्र अभिवादन!



# पत्रकार हा समाजाचा आरसा- सुनील त्र्यंबके

## पत्रकार दिनानिमित्त पत्रकारांचा सन्मान

**अहमदनगर । विजय मते**

पत्रकार हा समाजाचा आरसा असून समाजातील वास्तव, प्रश्न, अन्याय आणि सकारात्मक बदल जनतेसमोर मांडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य पत्रकार करीत असतात. लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून पत्रकारांची भूमिका अत्यंत जबाबदारीची आहे, असे प्रतिपादन सुनील त्र्यंबके यांनी केले. साई संघर्ष सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने पत्रकार दिनानिमित्त सावेडी उपनगरातील पत्रकारांचा सन्मान सोहळा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुनील त्र्यंबके यांच्या हस्ते पत्रकारांचा सन्मान करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ पत्रकार अशोक झोटिंग, विजय सांगळे, सचिन कांबळे, संदीप जाधव, श्रीनिवास सामल, बाळासाहेब गागरे, विजय मते, संदीप कांबळे तसेच साई संघर्ष सामाजिक प्रतिष्ठानचे पदाधिकारी, प्रभाग क्रमांक २ मधील उमेदवार रोशनीताई त्र्यंबके, निखिल वारे, महेश तवले, संध्याताई पवार, सुभद्रा त्र्यंबके, कविता भोसले, डॉ. प्रकाश त्र्यंबके, प्रविण भोसले, सुभाष निंबाळकर, महादेव शिरसाठ, आनंद कळंबे, देविदास गुडा आदींसह सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना सुनील त्र्यंबके म्हणाले की, पत्रकार हा केवळ बातम्या देणारा घटक नसून समाजाला दिशा देणारा मार्गदर्शक आहे. ग्रामीण व शहरी भागातील सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न, अडचणी व अपेक्षा शासन व प्रशासनापर्यंत पोहोचवण्याचे काम पत्रकार सातत्याने करीत असतात. अनेक अडचणी असूनही सत्याची बाजू मांडण्याचे कार्य पत्रकार करीत राहतात, हे निश्चितच कौतुकास्पद आहे. या सन्मान सोहळ्यात पत्रकारांनीही आपल्या भावना व्यक्त करत सामाजिक उपक्रमांसाठी प्रतिष्ठानच्या कार्याचे कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन योगेश पिंपळे यांनी केले तर आभार निखिल त्र्यंबके यांनी मानले. कार्यक्रमाचा समारोप सौहार्दपूर्ण वातावरणात झाला.

# ‘रामदास शिंगाडे’ सभासदांचा आवाज बनावे – सचिन झगडे

## शिंगाडे यांचा रयत सेवक समितीकडून सन्मान



**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

रयत शिक्षण संस्थेच्या श्रीगोंदा संकुलातील महादजी शिंदे विद्यालयात कार्यरत असलेले रामदास शिंगाडे यांची रयत सेवक बँकेच्या कर्जत शाखेच्या सभासद प्रतिनिधी म्हणून नुकतीच नियुक्ती करण्यात आली. या निमित्ताने रयत सेवक समितीच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी बोलताना रयत सेवक समितीचे अध्यक्ष सचिन झगडे यांनी रामदास शिंगाडे यांनी सभासदांचा आवाज बनून काम करावे तसेच सभासदांच्या समस्या व अडचणी बँकेच्या प्रशासनाच्या मदतीने सोडवाव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली. सभासदांच्या समस्या सोडवण्यासाठी कटिबद्ध राहीन, असे विचार रामदास शिंगाडे यांनी यावेळी व्यक्त केले. कार्यक्रमावेळी मंचावर विद्यालयाचे प्राचार्य दिलीप भुजबळ, उपप्राचार्य शहाजी एकाड, पर्यवेक्षिका सुनीता काकडे तसेच विकास लोखंडे, सुधीर साबळे आदी मान्यवर उपस्थित होते.



# अखिल भारतीय साहित्य संमेलनात डॉ. वंदना मुरकुटे यांचा सहभाग

**सातारा । सलीमखान पठाण**

सातारा येथे नुकत्याच पार पडलेल्या अखिल भारतीय साहित्य संमेलनात श्रीरामपूरच्या संत साहित्य अभ्यासक व माजी सभापती डॉ. वंदना मुरकुटे यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. संमेलनातील ग्रंथदिंडी पालखी खांद्यावर घेऊन त्यांनी साहित्यावरील आपले निस्सीम प्रेम व आदर व्यक्त केला.

या संमेलनाचे अध्यक्ष पानिपतकार विश्वास पाटील होते. त्यांनी डॉ. मुरकुटे लिखित सद्गुरू योगीराज गंगागिरी महाराजांचे सद्गुरू नारायणगिरी महाराज या पुस्तकावर यापूर्वी दिलेल्या समीक्षात्मक प्रतिक्रियेची आठवण यावेळी व्यक्त केली. संमेलनाचे उद्घाटन देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. उद्घाटनप्रसंगी स्वागत समितीचे अध्यक्ष विनोद जोशी यांनी साहित्य परिषदेत राजकीय हस्तक्षेप नको, अशी स्पष्ट भूमिका मांडली. तर साहित्य मंडळाचे अध्यक्ष मिलिंद जोशी यांनी हिंदी भाषा सक्तीबाबत नाराजी व्यक्त करत सरकारच्या धोरणांवर परखड मत मांडले. उद्घाटनपर भाषणात ज्येष्ठ लेखिका मृदुला गर्ग यांनी मराठी व दलित साहित्याचे जागतिक स्तरावरील योगदान अधोरेखित केले. मावळत्या अध्यक्ष ताराबाई भवाळकर यांनी लोकसाहित्याचा संदर्भ देत पर्यावरणविषयक चिंता व्यक्त केली. अध्यक्षीय भाषणात विश्वास पाटील यांनी पुस्तकसंस्कृती वाढीसाठी प्रत्येक गावात ग्रंथालय व पुस्तकदुकानांची गरज असल्याचे नमूद केले. संमेलनात कवी कट्टा, गझल कट्टा, बालकुमार कट्टा आदी साहित्यिक उपक्रमांनी कार्यक्रम रंगले. एकंदर संमेलनाने साहित्यप्रेमींना नवे अनुभव, आठवणी व वैचारिक समृद्धी दिली, अशी भावना डॉ. वंदनाताई मुरकुटे यांनी व्यक्त केली.



# कव्वाली ही आत्म्याशी संवाद साधणारी सूफी कला–डॉ. सुरुर

## परवेज हुसेन निजामी कव्वाल यांचा मखदूम सोसायटीकडून सन्मान

**अहमदनगर । आबीद खान**

कव्वाली ही केवळ गायनाची कला नसून ती सूफी विचारधारेतून जन्मलेली, माणसाच्या आत्म्याशी थेट संवाद साधणारी आध्यात्मिक परंपरा आहे. प्रेम, भक्ती, समर्पण आणि मानवतेचा संदेश देणारी कव्वाली आजही समाजाला एकत्र आणण्याचे कार्य करत आहे, असे प्रतिपादन डॉ. कमर सुरुर यांनी केले.

हैदराबाद येथील प्रसिद्ध कव्वाल परवेज हुसेन निजामी हे साहित्यिक व सांस्कृतिक सूफी कार्यक्रमासाठी नगरमध्ये आले असता, अहमदनगर जिल्हा उर्दू साहित्य परिषद, मखदूम एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटी आणि रहेमत सुलतान फाउंडेशनच्या वतीने डॉ. कमर सुरुर यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी युनुस तांबटकर, आबीद दुलेखान, सदाकत हुसैन, परवेज शेख, आरिफ सय्यद, राजु शेख, जावेद मास्टर, अबरार शेख आदी मान्यवर उपस्थित होते. डॉ. सुरुर पुढे म्हणाले की, कव्वाली ही अमीर खुसरो यांच्या परंपरेतून विकसित झालेली कला असून, तिने प्रेम, बंधुता आणि सर्वधर्मसमभावाचा संदेश दिला आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनात कव्वाली माणसाला अंतर्मुख होण्याची संधी देते. परवेज हुसेन निजामी यांसारखे कलाकार ही परंपरा जपून नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचे मोलाचे कार्य करत आहेत. अशा साहित्यिक व सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे समाजात सकारात्मक विचार रुजतात तसेच उर्दू भाषा व सूफी संस्कृतीचे संवर्धन होते, असेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमास रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कव्वाली कलेचा आनंद घेतला.

# अहमदनगर महाविद्यालयाच्या सूक्ष्मजीवशास्त्र विभागास तिसरे पेटंट



**अहमदनगर । रयत समाचार**

अहमदनगर महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र विभागातील प्रा. अभिजित आहेर व डॉ. अविनाश गावडे यांना ‘‘संमिश्र नायट्रोजन खत व वनस्पती वाढ प्रवर्तक आणि त्याची निर्मिती प्रक्रिया’’ या महत्त्वपूर्ण संशोधनासाठी भारतीय पेटंट कार्यालय, भारत सरकार यांच्याकडून पेटंट प्रदान करण्यात आले आहे. या यशामुळे शेती व पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात महत्त्वाची भर पडली असून महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेत मानाचा तुरा खोवला गेला आहे. या संशोधनात विशिष्ट रासायनिक प्रक्रियेच्या माध्यमातून वनस्पतींसाठी उपयुक्त, पोषक व परिणामकारक संमिश्र खत व वनस्पती वाढ प्रवर्तक विकसित करण्यात आले आहे. ही प्रक्रिया पर्यावरणपूरक असून हरित रसायनशास्त्राच्या तत्त्वांनुसार रचलेली असल्याने शाश्वत शेतीला चालना मिळणार आहे. सूक्ष्मजीवशास्त्र विभागाला मिळालेले हे तिसरे पेटंट असून विभागातील संशोधन परंपरा, नावीन्यपूर्ण विचार व शास्त्रीय दृष्टिकोनाची ही ठोस पावती मानली जात आहे. यामुळे विद्यार्थ्यांना संशोधनाची प्रेरणा मिळून पुढील उपक्रमांना दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. या प्रसंगी बी.पी.एच. हिवाळे सोसायटीचे अध्यक्ष डॉ. आर. जे. बार्नबस, महाविद्यालयाचे प्राचार्य नोएल पारगे तसेच डॉ. सय्यद रज्जाक उपस्थित होते. डॉ. बार्नबस यांनी संशोधन कार्याचे कौतुक करून पर्यावरणपूरक व हरित रसायनशास्त्रावर आधारित संशोधन ही आजची गरज असल्याचे नमूद केले. बी.पी.एच. हिवाळे सोसायटीकडून संशोधन व नवोपक्रमाला सातत्याने प्रोत्साहन दिले जाईल, असे आश्वासन देत त्यांनी प्रा. अभिजित आहेर व डॉ. अविनाश गावडे यांचे अभिनंदन केले.

# सांस्कृतिक उपक्रमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास– तृप्ती कोलते

## निमगाव वाघा येथे गुणदर्शन व सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात

**नगर तालुका । रयत समाचार**

निमगाव वाघा येथे नगर पंचायत समितीच्या वतीने आयोजित नगर तालुकास्तरीय विविध गुणदर्शन व सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात पार पडला. नगर तालुक्यातील विविध जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत आपल्या सुप्त कलागुणांचे प्रभावी सादरीकरण केले. हस्ताक्षर, वक्तृत्व, गीतीय गायन, वेशभूषा व समूह गीत अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणामुळे परिसरात



आनंदोत्सवाचे वातावरण निर्माण झाले.

निमगाव वाघा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या आवारात झालेल्या कार्यक्रमाचे उद्घाटन गटशिक्षणाधिकारी तृप्ती कोलते यांच्या हस्ते झाले. यावेळी विस्तार अधिकारी निर्मला साठे, केंद्रप्रमुख महादू उधार, अंबादास गारुडकर, बाबा गोसावी, भगवान बोरुडे, उत्तम भोसले, संजय धामणे, सरपंच उज्वलाताई कापसे, ग्रामपंचायत सदस्य, सामाजिक कार्यकर्ते पै. नाना डोंगरे, संजय दळवी, राजेंद्र खडके, संगीता कदम, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य राहुल कदम, मुख्याध्यापक शांत नरवडे, वर्षा औटी, बाळासाहेब कापसे यांच्यासह शिक्षक, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. गटशिक्षणाधिकारी तृप्ती कोलते म्हणाल्या की, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हा केवळ अभ्यासापुरता मर्यादित नसून कला, क्रीडा व सांस्कृतिक उपक्रमांतूनच व्यक्तिमत्त्व घडते. अशा कार्यक्रमांमुळे आत्मविश्वास व संघभावना वाढते. पंचायत समितीमार्फत असे उपक्रम सातत्याने राबविले जातील, असे त्यांनी स्पष्ट केले. प्रास्ताविकात निर्मला साठे यांनी ग्रामीण विद्यार्थ्यांमध्ये कोणतीही कमतरता नसून योग्य संधी मिळाल्यास ते गुणवत्ता सिद्ध करतात, असे नमूद केले. पै. नाना डोंगरे यांनी संस्कार व परंपरेचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी किरण सांगळे, विजय शिंदे, सविता गायकवाड व राणी पाटोळे यांनी विशेष परिश्रम घेतले.